टंचाई/नैसर्गिक आपत्ती/तात्काळ
सन २००६-०७ या चालू वित्तीय वर्षासाठी नियंत्रण अधिकाऱ्याकडे अनुदान सुपुर्द करणे..............
"मागणी क्र. सी-६-२२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य ( योजनेतर )"

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
शासन निर्णय क्रमांक ,एससीवाय - ०४०६/प्र.क्र. १५ /म-११(१)
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १६ ऑगस्ट, २००६.

संदर्भ : १) शासन पत्र महसूल व वन विभाग क्रमांक पी-२२४५/२००६-२००७/प्र.क्र. १४/ब-१, दिनांक १.४.२००६ व दि. १०.५.२००६.
२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एसयुपी-२००६/प्र.क्र. २१४/ब-१, दिनांक १०.८.२००६.
३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक सीएलएस-०८/२००६/प्र.क्र. ३४१/म-३, दिनांक १०.८.२००६.

**निर्णय :-**

चालु पावसाळी हंगामात राज्यातील सर्वच महसूली विभागातील जिल्ह्यांमधून झालेल्या अतिवृष्टीमुळे, तसेच धरणातील पाणी सोडल्यामुळे सर्वत्र पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या प्राथमिक अहवालानुसार दिनांक १४.८.२००६ अखेर राज्यात विविध कारणांनी ४६८ व्यक्ती मृत्युमुखी पडले असून सुमारे ४.५० लाख व्यक्तींचे पूर परिस्थितीचा धोका लक्षात घेऊन स्थलांतर करण्यात आले आहे. निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीत आपदग्रस्त झालेल्यांना मदत देण्याबाबत शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सीएलएस-०८/२००६/प्र.क्र.३४१/म-३, दि. १०.८.२००६ अनुसार आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. शासनाने घेतलेल्या उपरोक्त दि. १०.८.२००६ च्या आदेशानुसार मदत देण्यासाठी नियंत्रक अधिकाऱ्यांकडून (विभागीय आयुक्त) निधीची मागणी होत आहे. विभागीय आयुक्तांच्या या मागणीच्या अनुषंगाने मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र. सी-६-२२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य (योजनेतर) या मुख्य लेखाशीर्षाखाली ०२-पूर, चक्रीवादळे इत्यादी १०१-अनुग्रह सहाय्य ४१-सहाय्यक अनुदाने अंतर्गत सन २००६-२००७ या चालू वित्तीय वर्षात विभागीय आयुक्तांना खाली नमूद केल्यानुसार निरनिराळ्या उपशीर्षाखाली एकूण रु.३०००.०० लाख (रुपये तीन हजार लक्ष) मंजूर करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

| अ.क्र. | नियंत्रक अधिकारी | १०१(०१) रोख बेकारी भत्ता (२२४५०१५५) | १०१ (०४)(०५) इतर बाबी (२२४५ ०२४४) | ८००-इतर खर्च (२२४५०३५१) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | आयुक्त,कोंकण | १०० | १५० | ५० | ३०० |
| २ | आयुक्त,पुणे. | २७५ | १५० | ७५ | ५०० |
| ३ | आयुक्त,नाशिक | २७५ | १७५ | १०० | ५५० |
| ४ | आयुक्त,औरंगाबाद. | २७५ | १७५ | १०० | ५५० |
| ५ | आयुक्त, अमरावती. | २७५ | १७५ | १०० | ५५० |
| ६ | आयुक्त, नागपूर. | २७५ | १७५ | १०० | ५५० |
| | | | एकूण | | ३००० |

३. यापुढे अतिरिक्त निधीची मागणी करतांना या वितरीत केलेल्या रकमेच्या विनियोगाबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याची नियंत्रक अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे निधीची मागणी करतांना आपल्या विभागातील जिल्ह्यामधून खर्च न होऊ शकणारे अनुदान पुर्नविनियोजनाद्वारे प्रथम उपलब्ध करुन देण्यात यावे.

४. आहरण व संवितरण अधिका-यांनी कोषागार / उपकोषागार यांजकडे पाठविण्यात येणाऱ्या बिलासोबत जोडल्या जाणाऱ्या कॉम्प्युटर स्लिपमध्ये गौण / उपशीर्षाच्या "गणकयंत्र" संकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा असे आदेश कृपया संबंधित अधिकाऱ्यांना नियंत्रण अधिका-यांनी द्यावेत.

५. खर्चावर नियंत्रण राहून फार मोठ्या रकमेच्या पूरक मागण्या मागणे व त्यापेक्षा जादा रकमेचे परतावे करण्याचे टळेल अशी दक्षताही संबंधित अधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे. दरमहा होणाऱ्या खर्चाचे पत्रक पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत न चुकता महसूल व वन विभागाला प्राप्त होईल अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना कृपया नियंत्रण अधिका-यांनी द्याव्यात.

६. हा शासन निर्णय, वित्त विभागाकडील अनौपचारीक संदर्भ क्रमांक ७६/अर्थोपाय, दिनांक ९.८.२००६ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ.मा. दौंड)
वित्तीय सल्लागार व सह सचिव
महसूल व वन विभाग.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा कोषाधिकारी.
महालेखापाल १ ( लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई ( प्रत्येकी ३ प्रती)
महालेखापाल २ ( लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षण) महाराष्ट्र राज्य, नागपूर ( प्रत्येकी ३ प्रती)
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य,मुंबई,-४०० ०३२.
अधिदान व लेखाधिकारी,बांद्रे (पुर्व ) मुंबई-४००० ५१. मुंबई.
निवासी लेखाधिकारी, मुंबई.
सहसंचालक लेखा व कोषागरे, "संगणक शाखा, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला",मंत्रालयासमोर मुंबई-४०० ०३२ (२ प्रती )
वित्त विभाग (अर्थसंकल्प-४ / व्यय-९ / अर्थोपाय कक्ष), मंत्रालय, मुंबई-३२.
कार्यासन अधिकारी, (ब-१/म-३/पीएसी/पीएसी-१ कार्यासने), म.व व.वि., मंत्रालय, मुंबई- ३२.
म-११ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ ( निवड नस्ती)